# पिंपरी चिंचवड सायन्स पार्क, चिंचवड, पुणे-४११०१९

निविदा सुचना क्र.१/२०१९-२०

## निविदा फॉर्म - प्रपत्र ‘अ’

पिंपरी चिंचवड सायन्स पार्क इमारतीची स्वच्छता व साफसफाई व्यवस्थ करणे या कामाच्या निविदा अटीशर्ती खालीलप्रमाणे (निविदा सुचना अ.क्र. २ चे कामाबाबत)

१. निविदाधारकाने आपल्या कंपनीची रचना, संचालक मंडळ, व्यवस्थापन व कामगार यांचा तपशील सादर करावा.

२. निविदाधारकाने भविष्य निर्वाह निधी, लेबर लायसन्स, सेवा कर, आयकर, शॉप अॅक्ट परवाना पॅनकार्ड अ. प्रमाणपत्र पत्र निविदेसोबत सादर करणे बंधनकारक आहे.

३. मागील तीन वर्षाचा ताळेबंद सादर करावा.

४. निविदाधारक यांनी या कामासाठी व्हॅक्युम क्लिनर (ड्राय आणि वेट), स्वींगो ७५० या यांत्रिक मशिनचा वापर करणे तसेच मनुष्यबळ याव्दारे काम करणे बंधनकारक राहील. वरील मशिनरी निविदाधारकाकडे असलेबाबतचा पुरावा सादर करणे आवश्यक आहे.

५. निविदाधारकाने साफसफाई व स्वच्छता कामकाजासाठी लागणारे सर्व प्रकारचे साहित्य आवश्यकतेनुसार पुरविणे बंधनकारक राहील.

६. निविदाधारक यांना इमारत व परिसर साफसफाई कामी प्रति दिनी ७ इतके कामगार (पर्यवेक्षकीय कामासह)

७. अशा प्रकारचे काम शासकीय /निमशासकीय कार्यालय याठिकाणी केल्याचा पुरावा सादर करावा.

८. सायन्स पार्क हा शैक्षणिक प्रकल्प असल्याने त्याठिकाणची स्वच्छता व साफसफाई व्यवस्थेचा दर्जा उत्कृष्ट प्रतीचा असला पाहिजे. यामध्ये सायन्स पार्क संपुर्ण इमारत त्यामधील सर्व साहीत्य व परिसराची स्वच्छता याचा समावेश राहील. (उद्यान क्षेत्र वगळून)

९. निविदाधारक यांना ज्याची निविदा स्विकृत होईल त्यांना उर्वरीत अनामत रक्कमेचा एफ. डी. आर. करारनामा करतेवेळी सादर करावा.

१०. निविदाचे दर २ वर्ष कालावधीसाठी राहील. तसेच मंजुर केलेले दर निविदाधारकांवर बंधनकारक राहतील.

११. निविदाधारकाने दरपत्रक भरताना सर्व प्रकारचे करासह एकत्रित रक्कम भरावी.

१२. निविदाधारकाने साफ-सफाई करण्यासाठी आवश्यक मशिनरी व त्यासाठी लागणारे मनुष्यबळ व कामासाठी लागणारे साहित्य, रसायने सोबत जोडलेल्या यादीप्रमाणे पुरवावी लागतील.

१३. साफ-सफाई व स्वच्छता काम करत असताना मालमत्तेचे ठेखेदारांच्या कर्मचा-यांकडून नुकसान झाल्यास ठरवेल त्या किंमतीची भरपाई ठेकेदारास द्यावी लागेल.

१४. निविदाधारकास आठवड्यातून ३ दिवस यांत्रिक पध्दतीने व Vacuum cleaner वापरून साफसफाईची कामे करावी लागेल. तसेच लागणारे सर्व प्रकारचे आवश्यक साहित्य रसायने पुरविणे बंधनकारक राहील.

१५. निविदा धारकास ठरवून दिलेल्या कामाच्या वेळेनुसार कामकाज करावे लागेल. तथापि निविदाधारकास जादा वेळ थांबुन नेमुन दिलेल्या क्षेत्रात एखाद्या दिवशी जादा काम करावे लागेल.

१६. कामावर लावलेल्या कर्मचा-यांना काही अपघात अगर इजा झाल्यास याची संपुर्ण जबाबदारी ठेकेदारावर राहील.

१७. निविदाधारकास कामावर बालमजुर ठेवता येणार नाहीत.

१८. कामगारांना योग्य तो गणवेश, बुट, सुरक्षा साधन,मास्क, हॅन्ड ग्लोज ओळखपत्र इत्यादी देणे ठेकेदारावर बंधनकारक राहील. नसलेस प्रती कामगार र.रू. १०/- प्रति दिन प्रमाणे दंडाची रक्कम बिलातुन वसुल करणेत येईल.

१९. नेमुन दिलेल्या ठिकाणाची स्वच्छता रोजचे रोज करावी लागेल व दररोज केलेल्या कामाच्या नोंदीसाठी विहीत नमुन्यातील रजिस्टर ठेवणेत येवून त्यावर संबधित नियंत्रित अधिकारी यांची स्वाक्षरी घेणे बंधनकारक आहे. दरमहा केलेल्या कामाचा अहवाल व त्यासोबत आवश्यक ती कागदपत्रे दर केलेनंतरच बिल अदा केले जाईल.

२०. निविदाधारक यांना नेमुन दिलेले साफसफाईचे कामकाज पुर्ण क्षमतेने न केल्यास प्रतिदिन र.रू. २००/- दंड वसुल करणेत येईल.

२१. कामगारांची वेळोवेळी आरोग्य तपासणी करणे व ते कोणत्याही प्रकारचे गैरवर्तन करणार नाहीत याची ठेकेदाराने काळजी घेणे आवश्यक आहे.

२२. ठेकेदारांनी आपल्या सुपरवाझर व मॅनेजरला आधुनिक कम्युनिकेशन उपकरणे देणे आवश्यक आहे. (उदा. मोबाईल)

२३. ठेकेदारास कामगारांना करारनामा कालावधीत कर्मचा-यांचे संप/हरताल इ. पुकारल्यास त्यामध्ये भाग घेता येणार नाही.

२४. ठेकेदाराने कामावर लावलेल्या कर्मचा-यांचा सायन्स पार्कशी कोणत्याही प्रकारचा संबध राहणार नाही व नोकरीसाठी हक्क सांगता येणार नाही.

२५. ज्यांची निविदा स्विकृत करण्यात येईल त्यांना स्वखर्चाने योग्य त्या स्टॅम्पपेपरवर पिंपरी चिंचवड सायन्स पार्कला करारनामा करून द्यावा लागेल व याशिवाय रक्कम रूपये १००/- स्टॅम्पपेपरवर मनपाचे मा. नगरसदस्यांशी अथवा त्यांचे नातेवाईकांशी संबधित नसल्याचे नोटराईज्ड प्रतिज्ञापत्र करून द्यावे लागेल.

२६. उभयपक्षामध्ये होणा-या करारनाम्यात लबादाच्या कायद्याच्या तरतुदी लागु राहतील. उभय पक्षामध्ये कोणत्याही प्रकारचा वाद उध्दभवल्यास तो लबादाच्या कायद्यातील तरतूद अंतर्गत सोडविता जाईल. यामध्ये मा. आयुक्त पिं.चिं.मनपा तथा अध्यक्ष पिंपरी चिंचवड सायन्स पार्क याचा एकपक्षीय लवाद नेमण्यात येईल व लवादाचा निर्णय अंतिम राहील तसेच तो उभयपक्षावर बंधनकारक राहील.

२७. निविदाधारकास कॉन्ट्रक्ट लेबर एँक्टचे पालन करावे लागेल.

२८. कोणतीही अथवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता पुर्ण अथवा अंशत: मंजूर अथवा नामंजूर करण्याचा अधिकार अध्यक्ष पिंपरी चिंचवड सायन्स पार्क नी स्वत:कडे राखुन ठेवला आहे.

२९. सदरची जाहिरात www.pcsciencepark.org या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

३०. प्रस्तुतकामी संस्थेने त्याचे कर्मचा-यांस किमान वेतन कायद्याने तरतूदी प्रमाणे वेतन दिले पाहिजे व त्याअनुषंगाने कामगार कायद्याप्रमाणे ई.एस.आय. पगारी रजा, भविष्य निर्वाह निधी, बोनस, गणवेश, बुट सेवाकर, आयकर, इत्यादी बाबींचा पुर्तता करणे बंधनकारक आहे.

३१. प्रस्तुतकामी संबधित संस्थेकडे कॉनट्रक्ट लेबर अँक्ट १९७० नियम १२ अंतर्गत कामगार आयुक्त कार्यालय पुणे यांचे मार्फत देणेत येणारा परवाना, कर्मचारी भविष्य निर्वाह निधी प्रमाणपत्र, राज्य कामगार निधी, ई. एस.आय. प्रमाणपत्र सेल्स टॅक्स प्रमाणपत्र, वर्क्स कॉन्ट्रक्ट, रजिस्ट्रेशन, आयकर भरत असलेबाबतचा पुरावा इत्यादी कागदपत्रे आवश्यक आहे.

३२. सदर कामाची मुद्त २४ महिने राहील. तथापी प्रथमत: १२ महिने कालावधीचे कामकाज पाहून कामकाज समानधानकारक वाटलेस पुढील १२ महिने कालावधी करीता कामकाज देणेत येईल.

३३. दर महा प्रत्यक्ष उपस्थिती नुसार व कामाची प्रत्यक्ष पाहणी करून मुल्यांकनानुसार स्वच्छचा कामकाजाचे प्रतिमाह बील अदा करणेत येईल.

३४. कामाचा आदेश दिल्यानंतर ठेकेदाराने काम केले नाही तर त्याची अनामत रक्कम जप्त करणेत येईल. निविदाकारांनी निविदेचे दर हे निविदा प्रसिध्द केलेचे कालावधीत असलेले किमान वेतन दर विचारात घेऊन सर्वकरांसह प्रति सफाई कर्मचारी प्रतिमाह दर देणे आवश्यक आहे. किमान वेतन दरापेक्षा कमी वेतन दराच्या निविदा अपात्र ठरविणेत येतील.

३५. ठेकेदाराने सदरचे साफसफाई कामासाठी नेमावयाच्या स्वच्छता कर्मचा-यांना कामगार कायद्यातील तरतूदूप्रमाणे वेतन देण्याचे मान्य केले असून त्या विषयक कायद्यातील सर्व तरतूदू बंधनकारक राहतील. तसेच त्यांना शासनाचा सर्व्हिस टॅक्स व शिक्षण उपकर वेळोवेळी शासनाचे मागणीप्रमाणे भरावयाचा आहे. ठेकेदाराने सदरील तरतूदींचे पालन करण्यात कसून केल्यास त्यांची सर्वस्वी जबाबदारी ही ठेकेदारावर राहील.

३६. ठेकेदाराला सदरील ठेक्यान्वये देण्यात आलेल्या मासिक रक्कमेशिवाय अन्य कोणताही आकार किंवा जादा खर्च देण्यात येणार नाही. (शासनाचे सर्व्हिस टॅक्स व इतर कर यामध्ये शासनाने केलेले बदल यांस सदर अट लागू राहणार नाही. )

३७. प्रस्तुतचे स्वच्छता व्यवस्थेची कामे ठेकेदाराने अन्य कोणत्याही ठेकेदारास पोट ठेक्याने देता येणार नाही. सदरील ठेका हा पोटठेक्याने अन्य इसमास दिल्याचे आढळ्यास सदर ठेका रद्द करण्याचे हक्क व अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना राहतील.

३८. या कामाबाबत सायन्स पार्क या ठिकाणचे जबाबदार सक्षम अधिकारी जी आवश्यक कामे सांगतील व ज्या ज्या सूचना देतील त्या ठेकेदारास विनाअट मान्य असले पाहिजे.

३९. ठेकेदाराने संस्थेचे यापुर्वी मान्य केलेले दर त्या अनुषंगाने झालेली सर्व कागदपत्रे व पत्रव्यवहार हा करारनाम्याचा अविभाज्य भाग राहील.

४०. ठेकेदार यांच्याकडुन वरीलपैकी कोणत्याही अटीशर्तीचा भंग झाल्यास सदरचा ठेका तातडीने रद्द करून जमा केलेली अनामत रक्कम जप्त करण्याता अधिकार मा. आयुक्त तथा अध्यक्ष यांना राहील.

४१. मुख्य कार्यकारी अधिकारी व ठेकेदार यांच्यामध्ये कोणत्यागी प्रकारचा वाद उदभवला तर लवादाच्या कायद्याच्या तरतुदींच्या अनुषंगाने सोडवला जाईल. याकामी मा. अध्यक्ष तथा

मा. आयुक्त पिं.चिं.महानगरपालिका यांचा एकपक्षीय लवाद राहील व लवादाचा निर्णय हा उभय पक्षावर बंधनकारक राहील.

४२. निविदा मंजूर निविदाकारास करारनामा करणेपुर्वी ठेकेदार/ठेकेदारी संस्था पिंपरी चिंचवड मनपा चे विद्यामान नगरसेवक, स्विकृत सदस्य व पिंपरी चिंचवड मनपा अथवा पिंपरी चिंचवड सायन्स पार्कचे अध्यक्ष, संचालक, कर्मचारी यांचेशी नाते संबध नसलेबाबत र.रू. १००/- चे स्टॅम्प पेपरवर नोटराईज प्रतिज्ञापत्र सादर करावे लागेल.

४३. साफसफाई कामाकरीता ठेकेदाराने नेमलेल्या कर्मचा-यांना शासनाने वेळोवेळी निश्चित केलेल्या किमान वेतन कायद्यानुसार वेतन तसेच इतर आवश्यक वित्तलब्धी धनादेशाव्दारे संबंधित कर्मचा-यांच्या बँक खात्यात किंवा (Account Payee Cross Cheque) धनादेशाव्दारे जमा करणे व वेतन चिठ्ठी अदा करणे बंधनकारक राहील. यासाठी निविदाधारकास वेगळा आकार/चार्ज अदा केला जाणार नाही. मंजूर दरानेच साफसफाई व्यवस्था करावी लागेल.

४४. मंजुर निविदाकारास करारनामा करणेस पाचारण केले असता त्यांना करारनामा करून द्यावा लागेल व मान्य झालेल्या दरानुसार अनामत रक्कम भरावी लागेल. करारनामा करून देणेस टाळाटाळ अथवा असमर्थता दर्शविलेस भरलेली बयाणा, अनामत रक्कम जप्त करण्याचा अधिकार मा. आयुक्त तथा अध्यक्ष पिंपरी चिंचवड सायन्स पार्क, चिंचवड, पुणे -४११०१९ यांस राहील.

४५. निविदेचा ग्राहयता कालावधी निविदा उघडलेपासुन १२० दिवसांचा राहील.

४६. निविदा कार्यवाही पुर्ण झालेनंतर व सक्षम अधिकारी यांची खात्री झालेनंतर मंजूर निविदाधारका व्यतिरिक्त अन्य निविदाकारांची भरलेली बयाणा रक्कम अलाहीदा परत करणेत येईल. तसेच निविदेनुसार देणेत आलेला कामाचा हमी कालावधी काम संपलेपासून २ वर्षाचा राहील. सदर हमी कालावाधी संपल्यावर व त्या वर्षाचे संक्षम संस्था / शासनाव्दारे लेखापरिक्षण पुर्ण झालेनंतर मान्य निविदाधारकारांची अनामत रक्कम अलाहिदा अदा करणेत येईल.

४७. मान्य निविदाकारचे संबधित ठेकेदार/संस्था/एजन्सी यांचे मुळ मालकाने व ठेकेदार/संस्था /एजन्सी यांचे मार्फत करारनामा करणा-या व्यक्तीने स्वत: चे लगतचे महिन्यातील दोन फोटो, पत्यासह राहण्याबाबत पुरावा, (रेशनिंग कार्ड, लाईट बिल, मनपा कराचे बील), स्वत:चे पॅन कार्ड, बॅक पासबुक, झेरॉक्स ऊत्यादी कागदपत्रे सदर करणे बंधनकारक राहील.

४८. निविदा धारकास देण्यात येणा-या आदेशानुसार त्यांनी साफसफाई कर्मचारी वर्ग (स्त्री व पुरूष) यांची २ (दोन) वर्ष कालावधीसाठी नेमणुक करावयाचा असून नेमणेत आलेल्या कर्मचा-यांमधूनच

ड्युटी चार्टनुसार (रिलिव्हर व सुपरविजन चार्जेस सह)  करार पध्दतीने कर्मचारी रजेचे कालावधीत, गैरहजेरीचे कालावधीत पर्यायी व्यवस्था रपणे निविदाधारकावर बंधनकारक राहील व सुपरविजन कामी निविदाधारकाने त्यांचे मार्फत व्यवस्था करणे बंधनकारक असून त्यासाठी कोणताही जादा आकार (चार्जेस) दिला जाणार नाही. तसंच पुढील मिन्याचा ड्युटी चार्ट महिन्याचे २५ तारखेपुर्वी मुख्य कार्यकारी अधिकारी, सायन्स पार्क यांचेकडे देणे बंधनकारक आहे.

४९. टेडरिंग व्दारे दि.   /   /२०१९   ते दि.   /   /२०१९   रोजी दुपारी १२ ते ३ या वेळेत स्विकारलेल्या निविदा  दि.   /   /२०१९  रोजी दुपारी ०३.०० ते ०५.०० वाजता किंवा प्रसिध्द केलेल्या वेळेमध्ये निविदा कमिटीच्या वेळेनुसार संचालक मंडळ यांचे समोर उघणेत येतील. निविदा उघडतांना निविदाकरा स्वत: अथवा त्यांचा प्रतिनिधी उपस्थित राहू शकेल.

५०. निविदा प्रसिध्द केलेल्या कालावधीत असलेल्या किमान वेतन दरापेक्षा कमी कराची निविदा रद्द करणेचा अधिकार मा. आयुक्त तथा अध्यक्ष पिंपरी चिंचवड सायन्स पार्क, चिंचवड पुणे ४११०१९ यांना राहील.

५१. कोणतेही कारण न देता पुर्णत: किंवा अंशत: निविदा मंजुर अथवा नामंजुर करणेचा अधिकार मा. आयुक्त तथा अध्यक्ष पिंपरी चिंचवड सायन्स पार्क, चिंचवड पुणे ४११०१९ यांनी राखून ठेवला आहे.

५२. सदरच्या ठेक्याच्या अनुषंगाने नेमलेल्या कर्मचा-यांबाबत कोणत्याही प्रकारचा दाव/तक्रार/अपघात, नुकसान भरपाई इत्यादी वाद उध्दभवल्यास त्यास पुर्णपणे ठेकेदार जबाबदार राहतील व याबाबत सायन्स पार्कचा काही एक संबध राहणार नाही.

५३. सक्षम संस्थेच्या वतीने करण्यात येणा-या लेखा परिक्षणात काही त्रुटी अथवा काही आपेक्ष आठल्यास त्याची पुर्तता करणे ठेकेदारावर बंधनकारक राहील.

५४. शासनाचे वेळोवळी लागू होणारे नियम, अटी, शर्ती हे ठेकेदारास बंधनकारक राहतील.

५५. मुळ निविदेच्या अटी व शर्ती या करारनाम्याचा अविभाज्य भाग राहील.

५६. एकवेळ दरपत्रक सादर केलेनंतर त्यामध्ये कोणत्याही सबबीवर दरवाढ दिली जाणार नाही.

५७. आवश्यकतेनुसार कामगारांच्या कामाची वेळ सायन्स पार्क प्रशासनाच्या सोईनुसार राहील. (सलग अथवा दोन वेळात शिफ्टमध्ये)

उपरोक्त अटीशर्ती निविदाधारकास बंधन कारक राहतील. त्यामुळे उपरोक्त अटी पैकी कोणत्याही अटी व शर्ती व कायद्यातील तरतूदींचा भंग केल्यास निविदा/ठेका रद्द केला जाईल.

स्थळ प्रतिवर मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांची स्वाक्षरी असे.

सही/-

मुख्य कार्यकारी अधिकारी

पिंपरी चिंचवड सायन्स पार्क

चिंचवड पुणे -१९

वरीलप्रमाणे सर्व अटी, शर्ती मी/आम्ही वाचल्या असून त्या मला/ आम्हाला मान्य आहे./ आहेत. व त्या माझेवर/आमचेवर बंधनकारक राहील/राहतील. त्याबाबत मी/आम्ही खालील स्वाक्षरी / स्वाक्ष-या केली/केल्या आहे/आहेत.

शिक्का

ठेकेदाराची सही -

नाव व पत्ता -

जाहिरात क्रमांक -

क्र. सायन्स पार्क - /२०१९-२०

दिनांक - / /२०१